## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 13 Issue 1 OCTOBER 2020 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद

(एप्रिल १९९२ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

इतक्यातच माझा एक मित्र मला एका खूप प्रवास केला असलेल्या सुप्रसिद्ध अशा स्वामींच्या व्याख्यानाला घेऊन गेला. मी भल्यामोठ्या अपेक्षांचे गाठोडे घेऊन व्याख्यानाला गेलो पण रिक्त हस्तांनी परतलो. रात्री उशीरापर्यंत मी एकटाच माझ्या निराशेची पाळं–मुळं शोधत बसलो होतो. या स्वामींना बरेच काही माहीत होते, त्यांच्याजवळ अनुभवांचा भरपूर साठा होता, आणि ते बऱ्याच आध्यात्मिक गुरूंना भेटले होते.

लोकं त्यांना एक महान माणूस म्हणून ओळखत असत आणि खूप मोठ्या अपेक्षा घेऊन तेथे जमले होते. पण खरंतर ते स्वामी मला त्यांची कला सादर करणाऱ्या एखाद्या कलाकारासारखे वाटले. ते किती महान आहेत याची ते प्रेक्षकांना पदोपदी आठवण करून देत होते! अभिनय; प्रस्तुती! आणि त्यांनी ज्या काही प्राथमिक गोष्टी आमच्या पुढे मांडल्या, त्या अगदी सहजच कोठूनही आम्हाला मिळवता आल्या असत्या!

साहजिकच माझे विचार महर्षी अमरांकडे वळले. ते परिपूर्ण, अस्सल होते आणि त्यांनी कधीही कोणालाही प्रभावित करण्याचा प्रयत्न केला नाही. ते महान होते आणि थोर महात्म्यांसाठी स्वाभाविक अशा भव्यतेने, उदात्ततेने परिपूर्ण प्रत्येक क्षण ते जगले. पक्षी, गुलाब, लहान मूल, समुद्र आणि सूर्य गतिमान असतात आणि सहजपणे जगतात. ते अभिनय करत नाहीत, त्यांचे कौशल्य सादर करत नाहीत.

मी जर अमरांना भेटलो नसतो तर कदाचित मी पण टाळ्या वाजवत त्या स्वामींचे गोडवे गायले असते. मी त्यांचा मोठा अहंकार ओळखला नसता.

मला एक विलक्षण अनुभव आला. मला एका विशेष वर्गासाठी सूक्ष्मशरीराबद्दल अधिक माहिती हवी होती. पुस्तकांमध्ये थोडीच माहिती होती आणि काही विपर्यस्त तथ्य आधीच हाताळले गेले होते. मग मी ऋषींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आणि तो माझा आतापर्यंतचा सर्वात यशस्वी संपर्क होता. मला खूप मोलाची माहिती मिळत होती आणि मला जमेल त्या वेगाने मी ती माहिती भराभर लिहून घेत होतो.

काही मिनिटांनंतर मला माझे डोके जड झाल्यासारखे वाटू लागले आणि थोडे दुखायला पण लागले. मला त्याचे कारण नक्की माहीत होते म्हणून मी घाबरलो नाही. जेव्हा डोक्यामधील वेदना वाढू लागल्या तेव्हा मला त्यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळण्यापूर्वीच मी त्यांच्याशी झालेला माझा संपर्क तोडला. आणि तेव्हा मला मानवी मर्यादांची जाणीव झाली आणि ऋषींच्या उच्च लोकांतून मिळत असलेले ज्ञान प्राप्त करून आत्मसात करण्यासाठी शरीर आणि मनाला तयार करण्याच्या आवश्यकतेचे महत्त्व कळले. माझे गुरू म्हणाले होते – ऋषी तर ज्ञान आणि ऊर्जा देण्यासाठी नेहमीच तयार असतात. ते प्राप्त करण्यासाठी खरंतर तुम्ही स्वतःला तयार करणे आवश्यक आहे.

पुढे बरेच काम आहे आणि वेळ कमी आहे. मला हे देखील समजले आहे की ऋषींच्या या जगात कोणीही आपल्यावर काम लादत नाही. आपण काम हाती घेतो आणि आपण त्याचा थोडा भागही पूर्ण करू शकलो नाही, तर त्याबद्दल कोणीही कुरकुर करत नाही. काम लादणे, कुरकुर इत्यादी अशा सर्व गोष्टी फक्त आपल्या या मानवी तलावरच आढळून येतात. वरती, ऋषींच्या पातळीवर सर्व काही वेगळं असतं. ते आपल्याला संधी देतात आणि अमाप संयम राखून आपल्या प्रगतीची प्रतीक्षा करतात! काम हा मुद्दा नाही. प्रगती महत्त्वाची आहे!

माझ्या भोवतालच्या लोकांना अशा गोष्टी सांगायला मला खूप आवडतं. अशा गोष्टी लोकांपर्यंत पोहोचवण्यात खूप आनंद मिळतो. विशेषतः अशी आध्यात्मिक संपत्ती लोकांमध्ये वाटण्यात खूप आनंद मिळतो. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

बंगलोर शहरातील केंद्रांमध्ये होणारे ध्यान वर्ग रद्द राहातील. कोरोना विषाणूचा फैलाव आणि लस व औषध उपलब्ध होण्यास लागणारा वेळ लक्षात घेता, असे ठरविण्यात आले आहे की बंगलोर शहरातील केंद्रांमध्ये मार्च २०२१ पर्यंत वर्ग होणार नाहीत. एप्रिल २०२१ पासून पुन्हा वर्ग सुरू करण्याचा निर्णय तेव्हाच्या परिस्थितीनुसार घेण्यात येईल.

रविवारच्या वर्गांच्या वेबकास्टद्वारे ऑनलाईन वर्ग सुरू राहातील. प्राथमिक पातळीचे वर्ग देखील दर रविवारी सकाळी १० ते ११ पर्यंत ऑनलाईन घेतले जात आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी नवीन बॅच सुरू होते.

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) /
तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/- ड्राफ्ट कृपया
मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.

**Light**

provides us unfailing wisdom & strength to face our problems.

When we cannot find solutions to our problems at the human level, we can take the help of Light.

**Light is God.**

**Channel Light daily for at least 7 minutes anytime, anywhere.**

**Heal yourself. Heal the World.**

*Guruji Krishnananda*

### काही ठळक घडामोडी

- ३० ऑगस्ट २०२० रोजी महर्षी अमरांच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सध्याच्या कोविड परिस्थितीमुळे तपोनगरात जमणे शक्य नसल्यामुळे हा कार्यक्रम वर्च्युअली वेबकास्टद्वारे आयोजित करण्यात आला आणि आपले विद्यार्थी आपापल्या घरूनह्यात सहभागी झाले.
- तपोनगर येथील ध्यान वर्ग पुढील सूचनांपर्यंत रद्द राहातील. रविवारच्या वर्च्युअल वर्गांचे वेबकास्ट सुरू राहील.
- प्राथमिक पातळीचे वर्ग देखील आता ऑनलाईन घेण्यात येत आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी नवीन बॅच सुरू होते. हे प्राथमिक पातळीचे वर्ग सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत घेण्यात येत आहेत.
- प्राथमिक पातळीचे वर्ग देखील आता ऑनलाईन घेण्यात येत आहेत. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी नवीन बॅच सुरू होते. हे प्राथमिक पातळीचे वर्ग सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत घेण्यात येत आहेत.
- १३ सप्टेंबर रोजी शंबला गटातील ध्यानसाधक वेबकास्टद्वारे ह्या वर्गात सहभागी झाले आणि त्यांनी शंबलातील महान गुरूंकडून विशेष दीक्षा घेण्यासाठी मानसिक दुवा जोडून ध्यान केले.
- 'रा' देवतेकडून विशेष ऊर्जा ग्रहण करण्यासाठी २० सप्टेंबरला 'रा' गटातील ध्यानसाधकांनी मानसिक दुवा जोडून ध्यान केले. ■

गुरुजींचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुरुवार | पौर्णिमा |
| १० | शनिवार | कृष्णाष्टमी |
| १५ | गुरुवार | शिवरात्री |
| १६ | शुक्रवार | अमावास्या |
| १७ | शनिवार | नवरात्रारंभ |
| २३ | शुक्रवार | सरस्वती देवी पूजन |
| २४ | शनिवार | दुर्गाष्टमी |
| २५ | रविवार | महानवमी / आयुध पूजा |
| २६ | सोमवार | दसरा / विजयादशमी |
| ३१ | शनिवार | पौर्णिमा |

### तपोनगरातील कार्यक्रम

सध्या सर्व कार्यक्रम फक्त वेबकास्टद्वारे आयोजित करण्यात येत आहेत आणि तपोनगरमध्ये कार्यक्रमांसाठी लोकं एकत्र जमत नाही आहेत.

दर रविवारी – व्याख्यान, सकाळी ११ ते १२ पर्यंत
– प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

**नवरात्र – ध्यानाचे विशेष तंत्र**

१७ ऑक्टोबर पासून सुरू होणाऱ्या नवरात्रीच्या काळात आपल्याला आदिशक्तीच्या उपस्थितीचा आशीर्वाद लाभेल. आपण जास्त वेळ ध्यान करून अधिक प्रमाणात तिच्या ऊर्जा ग्रहण करू शकतो. आपण तिच्या उपस्थितीची जाणीव देखील बाळगू शकतो. नवरात्रीच्या सुरुवातीपासून दहा दिवस आपण ह्या विशेष तंत्राचा वापर करून ध्यान करू शकतो – निळ्या प्रकाशाच्या एका प्रचंड गोलाची कल्पना करा. त्या गोलात प्रवेश करा. प्रकाशगोलाचा, आदिशक्तीच्या ऊर्जांचा अनुभव घ्या. कोणत्याही मंत्राचा जप करण्याची आवश्यकता नाही. नवरात्रीतील प्रत्येक दिवशी आपण आपल्या दैनिक ध्यानाऐवजी ह्या तंत्राचा अभ्यास करू शकतो.

रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई-मेल द्वारा संपर्क साधावा.

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : वैशाली नितीन तरे

जेव्हा मी प्रकाश प्रवहनाचा सराव करतो, तेव्हा मला निवांत व सकारात्मक वाटते. जेव्हा मी घरी ह्याचा सराव करतो, तेव्हा मी माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतो. धन्यवाद.

**– ओंकार एस. लोखंडे, इयत्ता आठवी, विश्वकर्मा विद्यालय इंग्रजी माध्यमिक शाळा, पुणे**

जेव्हा मी प्रकाश प्रवहनाचा सराव करतो, तेव्हा मला प्रसन्न वाटते. मी सकाळी व अभ्यास करण्यापूर्वी असे दिवसातून दोन वेळा प्रकाशाचे प्रवहन करतो. आता मी माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतो आहे. पूर्वी मी फक्त ४५ मिनिटे अभ्यास करीत असे. आता मी २ तास अभ्यास करू शकतो आणि माझ्यात सुधारणा आहे.

**– शिवम रावल, इयत्ता आठवी, विश्वकर्मा विद्यालय इंग्रजी माध्यमिक शाळा, पुणे**

प्रकाश प्रवहनाच्या सत्रानंतर जेव्हा मी माझ्या वर्गात गेलो आणि व्याख्यान सुरू झाले, तेव्हा शिक्षक जे शिकवीत होते ते सर्व मला समजत होते. आम्हाला हे तंत्र शिकविले त्यासाठी मी आपले आभार मानतो.

**– तेजस राजू नानावरे, इयत्ता आठवी, विश्वकर्मा विद्यालय इंग्रजी माध्यमिक शाळा, पुणे**

जेव्हा प्रकाश प्रवहनाचे सत्र संपले आणि मी हळूच माझे डोळे उघडले, तेव्हा मला खूपच छान वाटले आणि माझे मन प्रसन्न झाले. जेव्हा आम्ही आमच्या वर्गात परत आलो, तेव्हा शिक्षक जे सांगत होते त्याचे मला सहज व पटकन आकलन होत होते.

**– प्रसाद कारंजे, इयत्ता आठवी, विश्वकर्मा विद्यालय इंग्रजी माध्यमिक शाळा, पुणे**

जेव्हा मी माझे डोळे बंद केले आणि प्रकाशास माझ्या शरीरामध्ये प्रवेश करण्याची विनंती केली, तेव्हा मला माझ्या शरीरामध्ये उष्णता जाणवली. आणि सत्रानंतर जेव्हा मी माझे डोळे उघडले, तेव्हा मला खूप ताजेतवाने व छान वाटले.

**– प्रांजवल प्रदीप गौर, इयत्ता आठवी, विश्वकर्मा विद्यालय इंग्रजी माध्यमिक शाळा, पुणे**

प्रकाश प्रवहन केल्यानंतर, मला माझ्या आत खूप स्फूर्ती व शांतता जाणवते ज्यामुळे मला माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. मी पूर्णपणे सकारात्मक विचारांनी भरून जाते आणि मला उत्साही वाटते. जेव्हा मला झोप येत असते, तेव्हा जर मी प्रकाश प्रवहनाचा सराव केला तर मला माझ्या आत एक प्रकारचा जोश आणि ताजेपणा जाणवतो आणि मला दिवसभर थकवा जाणवत नाही.

**– अक्षया बी., इयत्ता बारावी, एस बी एस मूथा मुलींची उच्च माध्यमिक शाळा, माम्बलम, चेन्नई**

प्रकाश प्रवहनाचा सराव करताना माझे विचार खूपच भरकटतात आणि कधीकधी मला झोप येते. पण प्रवहन केल्यानंतर मी स्वत:मध्ये बदल अनुभवते. मला दिवसभर छान, नीरव व शांत वाटते. मी अभ्यासावर छानपणे लक्ष केंद्रित करू शकते आहे विशेषत: गणिते सोडविताना. मी माझ्या रागावर नियंत्रण ठेवू शकते आहे.

**– श्रुती वर्मा, इयत्ता बारावी, एस बी एस मूथा मुलींची उच्च माध्यमिक शाळा, माम्बलम, चेन्नई**

प्रकाश प्रवहन करणे हा स्वत:ला ताजेतवाने करण्याचा एक खूपच चांगला मार्ग आहे. हे मला माझे मन भरकटण्यापासून थांबविण्यात मदत करते आणि माझ्या एकाग्रतेत प्रचंड सुधारणा झाली आहे. मला समजले आहे की एखाद्याच्या विचारांमुळे परिस्थिती बदलू शकते आणि मनाची शुद्धता महत्त्वाची आहे. मला वाटत असे की ध्यान करणे हे कठीण काम आहे पण प्रकाश प्रवहनामुळे मला हे समजण्यास मदत झाली आहे की ते कठीण नाही.

**– श्रीनिधी एम. आर., इयत्ता बारावी, एस बी एस मूथा मुलींची उच्च माध्यमिक शाळा, माम्बलम, चेन्नई**

मी दररोज प्रकाश प्रवहनाचा सराव करते. हे माझ्यासाठी खूपच उपयुक्त आहे. मी शीघ्रकोपी आहे परंतु आजकाल मी माझ्या रागावर नियंत्रण ठेवू शकते आहे. जर माझी चिडचिड झाली किंवा मी लक्ष केंद्रित करू शकले नाही किंवा माझ्या मनाचा गोंधळ झाला, तर मी प्रकाश प्रवहनाचा सराव करते. त्यानंतर मला प्रसन्न व शांत वाटते.

**– दुर्गालक्ष्मी व्ही., इयत्ता बारावी, एस बी एस मूथा मुलींची उच्च माध्यमिक शाळा, माम्बलम, चेन्नई**

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी, आपल्या अंत:करणातील चळवळ आहे. ही एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत, घोषणा फलक नाहीत, जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाश करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांतील अंध:काराला दूर करतो. त्यामुळे लोकांमध्ये परिवर्तन घडते. लोकांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूळ स्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्ज्वल भविष्य, आणि तो दिसत नसला तरी सर्वव्यापी आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगात परिवर्तन घडवूया.

प्रकाश प्रवाहित करून पसरवण्यासाठी, तुमच्या वर प्रकाशाच्या एका महासागराची कल्पना करा. मग कल्पना करा की, ह्या महासागरातून प्रकाशाचा एक झोत खाली अवतरत आहे आणि हा प्रकाश तुमच्या शरीरात प्रवेश करून त्याला पूर्णपणे भरतो आहे. एका मिनिटासाठी या प्रकाशाचा अनुभव घ्या. मग कल्पना करा की, हा प्रकाश तुमच्या शरीराबाहेर पडून हळूहळू तुमच्या घरात, मोहल्ल्यात, देशात आणि संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी सप्त ऋषींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवावा, ही विनंती.

वेब साईट: www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबलामध्ये राहणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या ऐहिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

मे २००६

काही आध्यात्मिक मार्ग रोचक असतात. कधीकधी ते अर्धा तास नुसते हसणे, अर्धा तास केवळ रडणे किंवा कदाचित अर्धा तास फक्त नृत्य करणे यांसारख्या तंत्रांचा अभ्यास करतात. कदाचित लोकांना असे करण्यात पुष्कळ ऊर्जा खर्च झाल्याने एक प्रकारचा आराम मिळतो. कदाचित त्याची त्यांना मदत होत असावी. मला टीका करण्याचा अधिकार नाही. मला माहीत नाही, कारण मी अशा प्रकारे कधीही नाचलो किंवा रडलो नाही. मी फक्त माझ्या गुरूंसोबत ध्यान केले आहे. एवढेच. माझा अनुभव मर्यादित आहे. पण तुमचा जर त्यावर विश्वास असेल, तर तुम्ही त्याला चिकटून राहा. तुम्ही तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचाल. हा एक भाग आहे. हे खूप रोचक आहे.

जरा गंमतीने मी सांगतो की मी एका व्यक्तीला काही गोष्टींचा खुलासा करण्यासाठी एक लहान चिठ्ठी लिहिली. तो आपल्या एका ध्यानसाधकाकडे आला आणि म्हणाला, "हे वाचा आणि ह्या चिठ्ठीमधे दडलेला अर्थ काय आहे तो मला सांगा." त्यात कोणताही दडलेला अर्थ नव्हता. त्यात स्पष्टपणे असे लिहिले होते, "कृपया वाट पाहा, मी तुमच्याशी नंतर बोलेन." साधारणपणे आपण प्रत्येक गोष्टीवर संशय घेतो. जेव्हा तुम्हाला माझ्याकडून काही संदेश मिळतो, काही निरोप मिळतो, तेव्हा त्यात कोणताही छुपा अर्थ नसतो. कधीकधी लोकं मला विचारत असत आणि आता देखील कधीकधी ते विचारतात, "तुम्ही माझ्याबद्दल बोलत होता का?" जेव्हाकेव्हा मी उदाहरण देऊन एखाद्या गोष्टीचा खुलासा करतो, तेव्हा त्यांना वाटते, "ते माझ्याबद्दल बोलत आहेत का!?" अनेक लोकं मला विचारतात. एकदा मी म्हटलं, "होय, अर्थातच मी तुमच्याबद्दल बोलत आहे." मला म्हणायचे आहे की ते तुमच्यापैकी प्रत्येकाला लागू पडते. आम्ही कोणाची निंदा किंवा टीका करण्याच्या हेतूने इथे उदाहरणे देत नाही. ती फक्त बोध घेण्यासाठी आहेत, एवढेच. त्यात कोणतेही छुपे अर्थ नसतात. मला वाटतं इथे गोष्टी अगदी साध्यासरळ आहेत. खरं तर आम्ही जाणीवपूर्वक गोष्टी खूप काटेकोरपणे आणि स्पष्टपणे मांडण्यात विशेषज्ञता प्राप्त केली आहे. विशेषत: लिहिताना, मी त्याबद्दल सावध असतो. बोलत असताना, कदाचित कधी मी खूप जास्त बोलत असेन. पण लिहिताना मी अगदी मोजके शब्द वापरतो. आणि ह्या गोष्टीची अनेकांनी प्रशंसा केली आहे. आमच्या "ऋषींकडून मिळालेले ज्ञान" ह्या पुस्तकाबद्दल लिहिताना एका व्यक्तीने ह्या मुद्द्याचा उल्लेख केला आहे – आम्ही संक्षिप्तपणे आणि मुद्द्याला धरून लिहितो. मी एक अगदी साधा माणूस आहे; मी जसा साधा आहे, तसाच माझ्या सांगण्यात किंवा लिहिण्यात सरळपणा आहे आणि त्यात कोणतेही छुपे अर्थ नाहीत.

मला समस्यांबद्दल एक मुद्दा सांगायचा होता. जेव्हा मी म्हणतो की आपल्याला असलेल्या सर्व समस्या आपण स्वत: निर्माण केल्या आहेत, तेव्हा माझे असे म्हणणे चुकीचे नाही. अर्थात हे थोडेसे क्रूर वाटू शकेल, पण ती वस्तुस्थिती आहे. मी फक्त स्मित करून तुम्हाला सांगू शकतो, पण आपल्याला फक्त तेव्हढीच सवलत आहे, त्याने वस्तुस्थिती बदलणार नाही. मला ज्या समस्या होत्या, त्या मी स्वत: निर्माण केलेल्या होत्या, असे मी म्हटले पाहिजे. कसे ते माहीत नाही पण आपल्या समस्या आपण ह्या जन्मात किंवा आधीच्या जन्मात आकर्षित केल्या आहेत. हे देखील खरे आहे की सर्व निराकरणे देखील आपल्याकडेच असतात. ती परमेश्वराकडून येत नाहीत. ती स्वर्गातून खाली उतरत नाहीत. आपल्या सर्व समस्यांची निराकरणे आपल्या आतच असतात. एखाद्या समस्येसाठी कोणता उपाय लागू आहे? कदाचित हे शोधण्यासाठी, हुडकून काढण्यासाठी थोडासा वेळ लागेल. हा साधनेचा एक भाग आहे. ह्यासाठी थोडा वेळ लागेल. एकदा का आपण याचे निदान केले आणि एकदा का आपण त्याचा शोध लावला, की आपल्याला त्याप्रमाणे कारवाई करता आली पाहिजे. हे म्हणजे फक्त समजून घेणे नाही. केवळ समजून घेणे पुरेसे नाही. आपण ते प्रत्यक्षात आणले पाहिजे. मग सर्वात आनंदी माणूस तो असेल ज्याने स्वत:च्या समस्येवर स्वत: तोडगा शोधून काढला असेल. जेव्हा आपण तपशीलात जातो, तेव्हा पुष्कळ प्रश्न विचारले जाऊ शकतात. पण आपण जर वेळ दिला, तर आपल्या लक्षात येईल की सर्व प्रश्नांची उत्तरे देता येतात. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देता येते.

भूतकाळ आणि भविष्यकाळ हे वर्तमानाचा एक भाग आहेत. आपल्या आयुष्यात, आपल्या जगण्यात वर्तमान काळ हाताळताना आपण भूतकाळ किंवा भविष्यकाळ वगळू शकत नाही. भूतकाळ आपल्याला विवेक आणि आत्मविश्वास देतो. भविष्यकाळ आपल्याला दिशा आणि उद्देश देखील देतो. म्हणून भूत आणि भविष्याशिवाय, वर्तमानाला काहीच अर्थ नाही. आपण या गोष्टींवर चिंतन करूया.

ऋषींनी आपल्याला जगण्यासाठी तत्त्वे दिली आहेत. कधीकधी आपल्याला वाटते की ही पुरेशी नाहीत. जेव्हाकेव्हा आपल्याला एखाद्या अवघड किंवा नवीन परिस्थितीला सामोरे जावे लागते, तेव्हा आपल्याला आढळते की ही तत्त्वे आपल्याला पूर्ण उत्तर किंवा योग्य, निश्चित दिशा देत नाहीत. अशा वेळी आपण आपले स्वत:चे मार्ग विकसित करावे अशी आपल्याकडून अपेक्षा आहे. कारण प्रत्येक व्यक्ती ही एका विश्वासारखी आहे. प्रत्येक व्यक्ती ही अद्वितीय, भिन्न आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीकडे, अर्थात ह्या तत्त्वांवर आधारित, परिस्थिती हाताळण्यासाठी स्वत:चा मार्ग असला पाहिजे. असे मार्ग विकसित करण्यासाठी आपल्याला तत्त्वांचे आणि ह्या आध्यात्मिक मार्गाचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. आणि ते समजून घेतल्यानंतर जर तुम्हाला स्वत:चा मार्ग विकसित करायचा असेल, नवीन आणि विशिष्ट समस्येचे निराकरण शोधायचे असेल, तर ऋषींचे स्मरण करा; तुम्ही त्यांच्याशी जोडले जाल. मार्ग शोधण्याचा प्रयत्न करा, तुम्हाला मार्ग मिळेल. मार्ग शोधण्यास, समस्येचे निराकरण शोधण्यास ऋषी मदत करतील.

मला म्हणावेसे वाटते की माझ्या आयुष्याच्या ह्या टप्प्यावर आणि ह्या वयात, मी असे मार्ग शोधण्यास अधिक सुसज्ज आहे. मी मार्ग शोधण्यात इतरांना मदत करू शकतो. जेव्हा लोकं माझ्याकडे येतात, तेव्हा मी माझे ज्ञान आणि माझ्याकडे जो काही "विवेक" आहे तो त्यांच्यासोबत सामायिक करू इच्छितो. हे लोकांवर अवलंबून आहे. परमेश्वराने मला जे काही भेट दिले आहे, माझ्या गुरूंनी मला जे काही दिले आहे, ते तुम्ही तुमच्यासोबत परत घेऊन जाऊ शकता. किंवा तुम्ही जे काही प्रश्न विचारता, त्यांची उत्तरे परत घेऊन जाऊ शकता. बहुतेक वेळा प्रश्न अगदी साधे असतात पण मी अगदी प्रामाणिकपणे उत्तर देतो. मला जे काही माहीत आहे, ते उत्तर मी देतो. जिथे माझ्याकडे उत्तर नाही, तिथे मी म्हणतो, तुम्ही उत्तर शोधा. कधीकधी एक व्यक्ती म्हणून आपल्याला आपले स्वत:चे निर्णय घ्यावे लागतात. आम्ही तुम्हाला निर्णय घेण्यास मदत करतो. आम्ही तुम्हाला उत्तरे शोधण्यास मदत करतो. ■

## श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

३०–०८–२०२०

महर्षी अमर हे नवीन युगाबद्दल खूप स्पष्टपणे आणि पूर्ण अधिकाराने बोलणारे पहिले गुरू होते. शेवटी त्यांना हे त्यांच्या स्वत:च्या ग्रहणक्षमतेने थेट माहीत होते. त्यांनी आपल्याला जे सर्व ज्ञान दिले, ते त्यांनी त्यांच्या स्वत:च्या अनुभवाने गोळा केले होते किंवा त्यांना ते महान ऋषींकडून आणि दैवी व्यक्तित्वांकडून थेट मिळाले होते. उदाहरणार्थ, त्यांना सप्त ऋषींबद्दल माहीत होते कारण ते त्यांना प्रत्यक्ष भेटले होते. त्यांना हे पुस्तकांतून जाणून घेण्याची आवश्यकता नव्हती. त्यांना सूर्याच्या आत असलेल्या अंतराळाबद्दल माहीत होते कारण त्यांनी तिथे सूक्ष्मदेहाने प्रवास केला होता आणि ते भगवान सूर्यनारायण यांना भेटले होते.

भगवान कल्की यांचे आगमन झाले आहे, त्यांनी जन्म घेतला आहे, असे अक्षरश: जरी नव्हे, तरी याची घोषणा करणारे गुरू ते होते. ते भगवान कल्की यांना भेटले होते! हे महर्षी अमरांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्यात अनन्यसाधारण असे काहीतरी आहे. त्यांची तुलना इतर गुरूंशी करण्याचा माझा उद्देश नाही. प्रत्येक गुरू त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने विशेष असतात. आपण इथे महर्षी अमरांच्या विशिष्टतेबद्दल बोलत आहोत. आपण महर्षी अमरांकडून शिकलेल्या अनेक गोष्टींबद्दल इतर कोणी गुरू बोलले आहेत का, याची आपल्याला आजतागत माहिती नाही. उदाहरणार्थ आपल्याला भगवान महावतारांविषयी माहीत आहे. महर्षी अमर जितक्या अधिकाराने त्यांच्याविषयी बोलले, तसे त्यांच्याबद्दल इतर कोणी बोलले असल्याचे मला माहीत नाही.

ह्या पृथ्वीवरील लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीच्या कार्यामध्ये सहभागी असलेले ते एक अतिशय महत्त्वाचे व्यक्ती आहेत. त्यांनी इतके कार्य केले आहे की त्यांच्या कार्याच्या विशालपणाचे पूर्णपणे आकलन होणे खरोखरच अवघड आहे. आणि त्यांच्या सर्व कार्यांची आपल्याला माहिती नाही. आणि तरीही जेव्हा गुरुजींनी त्यांना विचारले की, “तुमच्या जीवनाचे ध्येय काय आहे?”, तेव्हा ते म्हणाले, “ते फक्त तुम्हा लोकांना ऋषींच्या कार्यासाठी गोळा करणे होते.” ती त्यांची विनम्रता होती.

आपल्याला माहीत आहे की त्यांनी प्रचार केला नाही, त्यांनी त्यांचे सर्व ज्ञान जगजाहीर केले नाही. निश्चितच त्यांनी त्यांच्या भोवती असलेल्या लोकांना हे ज्ञान दिले. आता त्यांचे ज्ञान, त्यांनी दिलेले ज्ञान, जरी अद्याप आम्ही त्याचा प्रचार करत नसलो, तरी ते जगापर्यंत पोहोचत आहे. आपल्याकडे जे काही ज्ञान उपलब्ध आहे, ते आम्ही फक्त लोकांसमोर ठेवत आहोत, एवढेच. आम्ही ते फक्त उपलब्ध करून देत आहोत. मला वाटते की महर्षी अमर जगाला उपलब्ध करून देणे ही गुरुजींच्या सर्वात महत्त्वपूर्ण कार्यपूर्तींपैकी एक आहे. पुन्हा मी हे नमूद केले पाहिजे की गुरुजींनी जगासाठी, ऋषींच्या कार्यासाठी केलेले योगदान इतके प्रचंड आहे की ते आपल्या आकलनशक्तीच्या पलीकडे आहे. पण, माझ्या ह्या स्तरावरील मर्यादित समजूतीनुसार, मला वाटते की त्यांचे गुरु, महर्षी अमर यांच्याकडून मिळालेले ज्ञान, त्याची शुद्धता राखून आपल्यापर्यंत पोहोचवणे, ही एक खूप महत्त्वपूर्ण कार्यपूर्ती होती. आणि अर्थातच आपल्याला माहीत आहे की गुरुजींनी त्यात आणखी पुष्कळ ज्ञानाची भर घातली. ज्ञानाची सहज विकृती होऊ शकते कारण आपण गोष्टी आपल्या स्वत:च्या पद्धतीने समजून घेतो. माझा विश्वास आहे की ते ज्ञान पूर्णपणे आणि शुद्धपणे मांडण्यासाठी आणखी एका गुरूची आवश्यकता होती; ते ज्ञान जगण्यासाठी, ते ज्ञान कंपित करण्यासाठी आणखी एका गुरूची आवश्यकता होती, जेणेकरून ते प्रभावीपणे पुढे देता यावे. ते गुरू अर्थातच गुरुजी होते.

गुरुजींनी आपल्याला महर्षी अमरांच्या अनेक पैलूंबद्दल सांगितले; फक्त त्यांच्या क्षमता आणि त्यांच्या सूक्ष्म जगातील पराक्रमांबद्दलच नव्हे, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या इतर पैलूंबद्दल देखील सांगितले. महर्षी अमरांकडून त्यांना मिळालेले ज्ञान त्यांनी आपल्याला दिले – उदाहरणार्थ ध्यानसाधनेचे शास्त्र. आध्यात्मिक साधकासाठी या सर्व गोष्टी खूप महत्त्वपूर्ण आहेत. आपल्याला माहीत आहे की महर्षी अमरांचे जीवनच एका आध्यात्मिक साधकासाठी एक उत्तम शिक्षक आहे. आणि गुरुजींचे आभार की त्यांनी महर्षी अमरांच्या जीवनाचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अत्यंत सूक्ष्म पैलू समजून घेतले आणि आपल्याला सांगितले. ते आपल्यासाठी, आध्यात्मिक मार्गातील कोणत्याही विद्यार्थ्यासाठी खूप उपयुक्त आहेत. उदाहरणार्थ मानवी असणे किंवा एक माणूस म्हणून जगणे. आपल्या आध्यात्मिक साधनेसाठी हे खूप महत्त्वाचे आहे. आपल्याला हे माहीत नव्हते. आपल्याला जर हे गुरुजींकडून समजले नसते, तर कदाचित आपल्याला वाटले असते की साधनेचा हा भाग, म्हणजे मानवी असणे, तितकासा महत्त्वाचा नाही, आणि फक्त ध्यान करणेच महत्त्वाचे आहे.

गुरुजी आपल्याला सांगत असत की महर्षी अमर हे त्यांना भेटलेल्या लोकांपैकी सर्वोत्कृष्ट मनुष्य होते. त्यांच्यात असे काहीतरी होते ज्यामुळे लोकांना ते त्यांच्या खूप जवळचे असल्यासारखे वाटायचे. आणि, जसे आपण यापूर्वी बोललो होतो, फक्त लोकांनाच नव्हे तर दैवी व्यक्तित्वे आणि ऋषींना देखील ते त्यांच्या खूप जवळचे असल्यासारखे वाटायचे. त्यांच्यात असे काय होते, ज्यामुळे आपल्याला, लोकांना त्यांच्याशी खूप जवळीक वाटायची? ते त्यांचे प्रेम होते का? की तो त्यांचा साधेपणा होता? ते त्यांच्यातील देवत्व होते का? की ती त्यांची विनम्रता होती? तो त्यांच्यातील चांगुलपणा होता का? की त्यांच्यातील मानवता होती? ते काय होते? की तो त्यांनी इतरांसाठी केलेला त्याग होता? हे समजणे कठीण आहे. मी म्हटल्याप्रमाणे, त्यांच्या चुंबकत्वाचे, ज्याने लोकांना त्यांच्याकडे आकर्षित केले आणि त्यांच्या जवळ आणले, आकलन करणे अवघड आहे. अर्थातच त्यांच्याकडे महान क्षमता आणि शक्ती होती. पण माझा विश्वास आहे की केवळ महान क्षमता आणि शक्ती असल्याने लोकांना आपल्याशी जवळीक वाटू शकत नाही. त्या कदाचित लोकांना आपल्याकडे खेचू शकतील, त्या कदाचित लोकांना आपल्याकडे आकर्षित करू शकतील, पण हे जरूरी नाही की त्यांच्यामुळे लोकांना आपल्यासोबत मोकळेपणा जाणवेल, आपल्याबद्दल आपुलकी वाटेल. भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्यासाठी शारीरिक रूप धारण केले होते. त्यांच्या आधीच्या जन्मांबद्दल आपल्याला जास्त माहिती नाही. आपल्याला माहीत आहे की संत एकनाथांच्या जीवनकालात श्रीकृष्णांनी एका मुलाचे रूप धारण केले होते आणि १२ वर्षे त्यांच्याकडे काम केले होते.

ते इतके महान असल्याकारणाने, त्यांच्याकडे अकल्पनीय क्षमता आणि शक्ती असल्याकारणाने, ते जगाच्या कल्याणाशी संबंधित असलेल्या महान कार्यात सहभागी झाले असल्यामुळे, कदाचित त्यांची विनम्रता प्रकर्षाने दिसून येते. ती आपले लक्ष वेधून घेते किंवा ठळकपणे दिसते आणि कदाचित त्यांच्यातील इतर अनेक दैवी पैलूंव्यतिरिक्त त्यांच्या अशा विनम्रतेमुळेच लोकांना त्यांच्याशी खूप जवळीकता वाटते.

(पुढे पृष्ठ ६ वर)

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्षात ध्यान वर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी नोंदणी शुल्क २५०० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी १३०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क ४५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी आणि पाठ्यपुस्तकांची किंमत समाविष्ट आहे.

त्यानंतर, वार्षिक नूतनीकरण शुल्क, इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी ९०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क ३५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## श्री जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

(पृष्ठ ५ वरून पुढे)

आपल्या सर्वांना सुद्धा त्यांच्याशी एक प्रकारची आत्मीयता, जवळीकता जाणवते. त्यांची महानता त्यांच्यात आणि आपल्यात अंतर निर्माण करत नाही किंवा ती आपल्याला असे वाटू देत नाही की ते आपल्यापासून खूप दूर आहेत, आपल्यासाठी उपलब्ध नाहीत. ते आपल्या सर्वांसाठी सहज उपलब्ध आहेत. एका व्यक्तीने मला सांगितले की त्यांचा आवाज ऐकताना – आम्ही अलीकडेच त्यांचे बोलणे असलेली एक ऑडियो फाईल सोशल मीडियावर पोस्ट केली – तिला त्यांच्याबद्दल एक विशेष आत्मीयता, एक प्रकारची सलगी, जवळीकता असल्याची भावना जाणवली. असे आहेत महर्षी अमर!

त्यांच्या पद्धती नेहमीच अनन्य, खूप अनन्य होत्या. त्यांच्या आधीच्या एका जन्मात जेव्हा ते संत एकनाथ होते, आणि त्यांच्या गुरूंनी त्यांना प्रशासनाचा प्रभारी बनविले होते, तेव्हा एकदा एक संपूर्ण रात्र त्यांनी हिशेब जुळविण्यात घालवली होती; हिशेब जुळविण्यात कारण एका अगदी लहानशा रकमेचा हिशेब लागत नव्हता. मला वाटतं, मला नक्की माहीत नाही, पण कदाचित आजच्या काळातील एक रुपया किंवा त्याहूनही लहान रकम होती! आता आपण अशी रकम जवळच्या आकड्याशी पूर्णांकित करतो. पण त्यांनी तसे केले नाही. त्यावेळी ते कदाचित त्यांच्या किशोरावस्थेत असावेत. आणि सकाळी शेवटी जेव्हा त्यांना चूक सापडली, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की त्यांनी आनंदाने उड्या मारण्यास सुरुवात केली! जी व्यक्ती देवांसोबत बोलते, ती हिशेब जुळविण्याबाबत इतकी चोखंदळ असते! म्हणूनच मला वाटते की त्यांच्या पद्धती अनोख्या होत्या. त्या आध्यात्मिक साधकाने अनुसरण करण्यासाठी सर्वात मोठी उदाहरणे आहेत.

संत एकनाथांच्या जीवनातील आणखी एक रोचक घटना : त्या दिवसात लोकं गंगा नदीचे पवित्र जल रामेश्वरमला, भगवान शंकर यांना अर्पण करण्यासाठी घेऊन जात असत. त्या काळी कदाचित असा समज होता की असे केल्याने मोठा आध्यात्मिक लाभ होतो किंवा कदाचित ते तुम्हाला मोक्ष किंवा मुक्तीकडे नेते. आणि म्हणून ते इतरांसह हे जल सोबत घेऊन जात होते. वाटेत त्यांना एक गाढव दिसले, जे खूप तहानलेले होते, आणि त्यांनी हे जल गाढवाला पाजले! त्यांनी स्वत:च्या मुक्तीची चिंता केली नाही. मला वाटते की ह्यात एक मोठा बोध आहे. हा बोध फक्त त्या काळासाठीच नव्हता, तर तो आताच्या काळात सुद्धा सुसंबद्ध आहे. देवळात जाण्यापेक्षा किंवा तसे सांगायचे तर ध्यानापेक्षाही प्रेम प्रकट करणे जास्त महत्त्वाचे आहे. त्यांनी फक्त त्यांच्या मुक्तीचाच त्याग केला नाही तर ह्या कृतीतून हे दाखवून दिले की मुक्ती फक्त अशा कृतींनी, जसे की जल अर्पण करणे, मिळवता येत नाही. जरी अशा कृतींमुळे आध्यात्मिक लाभ मिळतो, तरी आध्यात्मिक प्रगतीसाठी फक्त ही कृत्ये पुरेशी नाहीत. त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती यासारख्या अनोख्या होत्या. आणि संत एकनाथांसारखेच, महर्षी अमरांनी सुद्धा त्यांच्या जगण्यातून खूप काही शिकवले.

गुरुजी सांगत असत की त्यांनी कधीही महर्षी अमरांना उद्विग्न झालेले पाहिले नाही. ते नेहमी शांत असायचे. महान आध्यात्मिक सत्ये सांगताना देखील ते त्यांना नाट्यमय पद्धतीने न मांडता अगदी सहजपणे कथन करीत असत. आणि जरी त्यांचे जीवन साहसांनी भरलेले होते, सूक्ष्म पातळीवरील महान कार्यांनी भरलेले होते, तरी ते मानवी जीवन देखील खूप आवडीने जगले.

आपण महर्षी अमरांचे आभारी असले पाहिजे. आपण आपला आध्यात्मिक प्रवास त्यांच्या प्रकाशाच्या मार्गदर्शनात करत आहोत. आपण त्यांच्या प्रकाशात चमकत आहोत, कदाचित वेगवेगळ्या अंशात, त्याने काही फरक पडत नाही. एके दिवशी, जेव्हा आपल्या शुद्धीकरणाची प्रक्रिया पूर्ण होईल, तेव्हा आपण तेजस्वीपणे चमकू शकू. आपण आपल्या जगण्यातून त्यांना पूर्णपणे प्रकट करू शकू. तेजाच्या त्या पातळीपर्यंत पोहोचणे ही आपली साधना आहे. अशा स्थितीत पोहोचणे जेव्हा आपण त्यांना पूर्णपणे प्रकट करू शकू – ही आपली साधना आहे. ■

# प्रश्नोत्तरे

(श्री. जयंत देशपांडे)

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

**प्र: जेव्हाही मी काही करतो तेव्हा सतत माझ्या मनात हे विचार येत असतात की मी जे काही करतो आहे ते बरोबर आहे की नाही?**

उ: असे आपल्यापैकी बहुतेकांबाबत घडते. आपण आपल्या अंत:प्रेरणेची मदत घ्यायला हवी. आपण आपल्या अंत:करणाचे ऐकायला हवे, मग आपण चूक करणार नाही. या संदर्भात आणखी एक मुद्दा आहे की, आपण जर एखादी चुकीची गोष्ट करण्याचे ठरवले तर तसे करणे बरोबर नाही हे आपल्याला नक्कीच कळत असते. म्हणून आपल्या अंत:करणाचे ऐकण्याशिवाय आपण ध्यान करणे आणि आध्यात्मिक प्रगती करणे सुद्धा गरजेचे आहे. जसजशी आपण स्वत:ची प्रगती करतो आणि स्वत:चे शुद्धीकरण करतो तसतशी आपली विचारसरणी स्पष्ट होत जाते आणि आपली अंत:प्रेरणा अधिक तीक्ष्ण होते. मग आपण अशा पातळीवर पोहोचतो जिथे आपण स्वाभाविकपणे योग्यच गोष्टी करतो. आपली ती सवयच बनते. आपण प्रकाशाशी संरेखित होऊन जीवन जगायला लागतो. परंतु सुरवातीला जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असते.

**प्र: केवळ तेच आत्मे ज्यांच्यात आध्यात्मिक परिवर्तन घडलेले आहे, प्रकाशयुगात प्रवेश करू शकतील, तर इतर आत्म्यांचे काय होईल, ज्यांच्यात परिवर्तन अजून झालेले नाही?**

उ: आपल्याला गुरुजींकडून जसे समजले आहे, त्याप्रमाणे कोणाकडेही दुर्लक्ष केले जाणार नाही. देवाच्या जगात कोणालाही वगळण्यात येत नाही. ऋषींच्या या जगात कोणीही मागे राहत नाही. प्रत्येकाचे खूप प्रेमाने मार्गदर्शन करण्यात येईल. परिवर्तनाच्या संधी नेहमीच उपलब्ध राहतील. काही लोक कदाचित त्यांच्या काळाच्या पुढे जगत असतील, परंतु संपूर्ण जगाला प्रकाशयुगात प्रवेश करण्याकरिता, बहुसंख्य लोकांनी प्रकाशाची निवड करणे गरजेचे आहे, त्यांच्या काळाच्या पुढे जगणे आवश्यक आहे. तेव्हाच नवयुगाची पहाट होऊ शकते. आपण आता प्रकाशाची निवड करून ऋषींची मदत करू शकतो, जे दुसऱ्या पातळीवर खूप मोठ्या प्रमाणावर कार्य करत आहेत. लोकांना नवयुगाबद्दल माहीत होण्यासाठी, त्यांच्या मदतीकरता ते मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पसरवत आहेत.

**प्र: प्रकाश जर आपले मार्गदर्शन करू शकतो, तर मानवी गुरूंची काय गरज आहे?**

उ: मला हे समजले आहे: मानवी व्यवस्था चालवण्यासाठी आपल्याला मानवी पुढाऱ्यांची आवश्यकता असते. उदाहरणार्थ शाळा चालवण्यासाठी आपल्याला एका मुख्याध्यापकाची आवश्यकता असते. आध्यात्मिक दृष्टिकोनातून आपल्याला आध्यात्मिक नेत्याची किंवा अशा गुरूची आवश्यकता असते, जो प्रकाशाला जाणतो, ज्याने प्रकाशाची अनुभूति घेतली आहे, जो आपल्याला प्रकाशाकडे नेऊ शकतो, कारण आपण अज्ञानी आहोत आणि आपल्याला प्रकाशाविषयी माहीत नाही. तो आपल्याला प्रकाशाबद्दल जागरूक बनवू शकतो, आपण प्रकाशाची अनुभूति घेऊ शकतो आणि प्रकाशाबरोबर असलेले आपले नाते दृढ करू शकतो. मानवी गुरू आपले मार्गदर्शन करतो. जेव्हा आपण प्रकाशासोबत दृढ संबंध निर्माण करतो आणि जेव्हा आपण प्रकाशाचा अनुभव घेऊ लागतो, तेव्हा प्रकाश आपल्याला मार्गदर्शन करण्यास सुरवात करतो.

**प्र: आपण वाचत असलेल्या एखाद्या पुस्तकातून मिळालेल्या तंत्राचा, तसेच इतर मार्गातील गुरूंनी त्यांच्या प्रशिक्षण वर्गात शिकवलेल्या तंत्राचा अभ्यास करणे योग्य आहे का?**

उ: आपण वाचत असलेल्या पुस्तकांमधील तंत्रांचा सराव टाळण्यासाठी आपल्याला गुरुजींनी स्पष्टपणे सांगितले होते. एखाद्या गुरूकडून ध्यानाचे तंत्र शिकणे, मंत्र मिळवणे हे सर्वात योग्य आहे, असे मला वाटते. जर आपण गुरूंकडून शिकत असलो आणि अभ्यास करतांना आपल्याला जर काही अडचणी येत असल्या, तर आपले मार्गदर्शन करण्यासाठी कोणीतरी असतं. माझ्या मते सर्व उपलब्ध स्त्रोतांमधून ज्ञान गोळा करण्यासाठी आपण स्वतंत्र असले पाहिजे. परंतु, आध्यात्मिक साधनेसाठी मला वाटते की आपण आपल्या गुरूंना चिकटून रहावे. ■

## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| Master-Pupil Talks - Vol 2 | 75/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 1 & 4 | each 200/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 2 & 3 | each 250/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |

## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

Published: 21st of Every Month. RNI. No. KARMAR/2008/27314 Regd. Postal Regn. No. KRNA/BGE/1125/ 2020-2022
Date of posting Newsletter-25th or 27th or 29th of Every Month. Posted at Bangalore PSO, Bg-560026 No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### तपोनगर

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

६ ऑगष्ट २०२० रोजी मी एक दृष्टांत पाहिला, त्यात मला जयंतजी आणि गुरुजींनी काही दैवी व्यक्तिमत्त्वांना आमंत्रित केलेले दिसले. ती व्यक्तिमत्त्वे खूपच देखणी दिसत होती. मला गुरुजी त्यांना आलिंगन देतांना दिसले. मी चौरस आकाराचे दोन तलाव पाहिले. आणि आपल्या स्वयंसेवकांपैकी एकजण त्याबद्दल मला सांगत होता. पाण्याच्या त्या तलावांकडे जाण्यासाठी मला ज्या वाटेवरून जावे लागले, ती वाट आपल्या तपोवनाच्या एका वाटेसारखीच होती. मला वाटले की ते दृश्य तपोनगरचेच होते. जयंतजींनी आयोजित केलेल्या ध्यानवर्गात येण्याची वाट पाहणारे बरेच विद्यार्थी मला दिसले.

– मूर्ति के. ई.

७ ऑगष्ट २०२० च्या पहाटे पहाटे मला एक स्वप्न सदृश अनुभव आला, ज्यात मला गुरुजी आणि आपले सर्व स्वयंसेवक दिसले. कुठल्यातरी कार्यक्रमाची तयारी सुरू होती किंवा त्यांची बैठक होणार होती. बैठकीच्या पूर्वतयारीसाठी लोकं बऱ्यापैकी व्यस्त दिसले. जयंतजी गुरुजींसोबत कामाचे समन्वय करत होते. स्वयंसेवकांमध्ये असणारी माझी पत्नी मी ओळखू शकलो पण मला खात्री आहे की तिथे सर्व स्वयंसेवक त्यांच्यासोबत होते. सर्वजण पांढऱ्या पोशाखात होते.

– मनोज चोप्रा

एक वर्षापूर्वी मी जसे आयुष्याकडे पाहत होतो, त्यापेक्षा वेगळ्या दृष्टिकोनातून आता मी त्याच्याकडे पाहतो आहे. मी त्याच्याकडे उत्क्रांतीच्या दृष्टिकोनातून पाहत आहे. देव मला जे पाहिजे ते नेहमी ऐकतो आणि तो नेहमीच माझ्याशी बोलतो परंतु, त्याला ऐकणे किंवा तो काय बोलतो ते समजणे हे एक आव्हान आहे.

– अरुणकुमार तेलापोलू

गुरुजींचा अंतिम संदेश होता की ते आपल्या प्रत्येकाला वैयक्तिकरित्या मार्गदर्शन करतील. मी आता प्रत्येक क्षणाला त्यांचे मार्गदर्शन अनुभवत आहे. ते या आधी पण मिळत होते, परंतु आता दैनंदिन कामात देखील त्यांच्या मार्गदर्शनाची प्रचीती येते.

– शांताकुमारी एच. एस.

दोन आठवड्यांपूर्वी मी जेव्हा ध्यान करत होते तेव्हा अचानक मला माझ्या शेजारी एक फिक्या पिवळ्या रंगाची आकृती उभी आहे असे वाटले. ओरिएंटेशन वर्गात आम्हाला भगवान कलकी आमच्यासमोर उभे आहेत आणि आपण त्यांना ऊर्जा वाहून त्यांच्याकडून प्रकाश ग्रहण करतो आहोत अशी कल्पना करायला सांगितले होते. अगदी तसेच मला वाटले. खरोखरंच भगवान कलकी माझ्या खुर्चीजवळ उभे राहून माझाकडे प्रकाश पाठवत होते का? ती आकृती खूपच पुसट होती, म्हणून मी माझ्या अंतःप्रेरणेला विचारले आणि तिने सांगितले की ते खरंच भगवान कलकीच होते! मी खूप आनंदी आणि उत्साहित झाले.

– रत्नकला पाकला

जन्माष्टमीनंतर माझे खूप छान कृष्णचेतना ध्यान झाले. ध्यानात मला पूर्ण शांतता आणि स्तब्धता अनुभवता आली. अचानक मला एका सुंदर मोर दिसला, त्याच्या सुंदर फुलवलेल्या पिसाऱ्यासह! मी खरोखर चकित झाले कारण ते दृश्य खूपच विलक्षण होते! बहुतेक कृष्णच मला सांगत होता की तो माझ्याबरोबर आहे! कदाचित मला तसे कळवण्याची ही त्याची पद्धत असावी. माझे ध्यान पूर्ण झाले तेव्हा माझ्या मनात एक अद्भुत भावना होती, तिला असीम शांतीची आणि प्रार्थनामय भावना म्हणता येईल.

– विद्या वीरकर

माझ्या साधनेचा शेवटचा अहवाल सादर केल्यापासून मला वाटते ऋषी, गुरुजी आणि अमराजी मला माझ्या साधनेत खरोखरीच मदत करत आहेत. मला खूप उत्तेजना मिळाल्यासारखे वाटत आहे, कारण मी पहाटे ३.३०ला उठू शकत आहे आणि पहाटे ४ला ध्यानाला बसू शकत आहे! सद्य परिस्थिती अशी असूनही मी आतून खूप शांत आहे आणि नेहमीप्रमाणे मला संरक्षित वाटते आहे. जयंतजी आणि वरिष्ठ मार्गदर्शकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल परत एकदा त्यांचे आभार. आपला हा अलौकिक मार्ग निवडल्याबद्दल मी खूप भाग्यवान आहे असे मला वाटते.

– नंदिता पटेल

टाळेबंदीच्या दरम्यान एके दिवशी रात्री उशीरा मी माझ्या कारमधून काहीतरी आणण्यासाठी घराबाहेर पडलो. घराच्या किल्ल्या आपण सोबत घेतल्या नाही आहेत हे कळण्याच्या आधीच मी घराचे दार ओढले आणि ते बंद झाले. आणि मी घराच्या बाहेरच अडकून पडलो. मला घरात शिरण्यासाठी कुठलाही मार्ग नव्हता! मी लॉक कंपनीला फोन केला कारण ते अशा परिस्थितीत मदत करतात पण टाळेबंदी असल्यामुळे त्यांचे ऑफिस पण बंद होते. मी एका सुताराला फोन केला, आणि तो टाळेबंदी असूनही आणि रात्री खूप उशीर झालेला असूनही फक्त १० मिनिटांतच आला. घराच्या दाराचे लॉक उघडून देण्यामध्ये त्याचे यशस्वी होणे हे कोणत्या चमत्कारापेक्षा कमी नव्हते!

– विनम्र लोंगानी

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560077 and
Printed at M/s. ART PRINT, 719/A, West of Chord Road, 2nd Stage, Rajajinagar, Bangalore - 560086. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande